लोकमत समाचार

# फाइव स्टार रेटिंग हासिल करना है लक्ष्य

## स्वच्छ सर्वेक्षण योजना की समीक्षा बैठक में बोले मनपा आयुक्त

अहमदनगर। 18 दिसंबर। लोस सेवा

अहमदनगर महानगर पालिका ने केंद्र सरकार के स्वच्छ सर्वेक्षण- 2021 और राज्य सरकार के 'माझी-वसुंधरा' अभियान में हिस्सा लिया है. पिछले साल स्वच्छता के मामले में अहमदनगर शहर 40वें क्रमांक पर पहुंचा था और हमने तीन सितारा रेटिंग हासिल की थी. अब इस वर्ष हमें फाइव स्टार रेटिंग का लक्ष्य अर्जित करना है. इसके लिए सभी को प्रयास करने होंगे.

उक्ताशय का आह्वान गुरुवार को यहां मनपा आयुक्त श्रीकांत मायकलवार ने किया. वह अहमदनगर महानगर पालिका के विविध महकमों के शीर्ष अधिकारियों के साथ हुई एक बैठक में बोल रहे थे. स्वच्छ सर्वेक्षण- 2021 और माझी-वसुंधरा अभियान की कार्य योजना को लेकर यह समीक्षा बैठक आयोजित की गई थी. मनपा आयुक्त ने प्रशासन के सभी विभागों को अपनी जिम्मेदारियां बेहतर ढंग से निभाने सहित लोगों में जागरूकता बढ़ाने और अभियान को लेकर उन्हें सहयोग के लिए प्रेरित करने की अपील अधिकारियों से की.



अहमदनगर में गुरुवार को स्वच्छ सर्वेक्षण- 2021 और माझी-वसुंधरा अभियान की कार्य योजना पर मनपा आयुक्त ने अधिकारियों संग चर्चा की.

बैठक के आरंभ में राहुल अहीरे और सौरभ जाधव सहित उपरोक्त अभियान के परियोजना अधिकारियों ने कार्य योजना को लेकर प्रस्तुतियां दीं. इस अवसर पर उपायुक्त डॉ प्रदीप पठारे, संतोष लांडगे, सहायक आयुक्त राउत, परिमल निकम, राम चारठाणकर, प्रवीण मानकर, रोहीदास सातपुते, डॉ अनिल बोरगे, डॉ नरसिंह पैठणकर, अभियान के शहर समन्वय लक्ष्मण लांडगे, मेहेर लहारे, अशोक साबले, वैभव जोशी, श्रीकांत निंबालकर, मनोज पारखे, तड़वी सहित सभी प्रभाग अधिकारी उपस्थित थे.

# शहरी कचऱ्याचे विलगीकरण होणे आवश्यक

## प्रकल्प अधिकारी अहिरे यांचे आवाहन । नागरिकांनी किचन वेस्टपासून कंपोस्ट खत बनवावे

अहमदनगर । नगर सह्याद्री

शहरी कचऱ्याचे विलगीकरण होणे आवश्यक असल्याचे मत प्रकल्प अधिकारी राहुल अहिरे यांनी व्यक्त केले.

रेल्वे स्टेशन परिसरातील मल्हार चौक येथील अभय ललवाणी हे गेल्या चार वर्षांपासून किचन वेस्ट पासून कंपोस्ट खत तयार करण्याचा उपक्रम राबवित आहेत, त्याची पाहणी श्री अहिरे यांनी केली. यावेळी अभियानाचे शहर समन्वयक लक्ष्मण लांडगे उपस्थित होते.



अहमदनगर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या सर्वेक्षण २०२१ व राज्य शासनाच्या माझी वसुंधरा अभियान भाग घेतला आहे.

या अभियानात यशस्वी होण्यासाठी तसेच मानांकन मिळवण्यासाठी शहरात दैनंदीन संकलित होणाऱ्या कचऱ्याचे विलगीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे कचऱ्यावर प्रक्रीया करणे सोपे होते. नागरिकांनी किचन वेस्टवर आपल्या परसबागेत प्रक्रिया केल्यास बागेतील झाडांसाठी उत्तम प्रतीचे कंपोस्ट खत तयार होऊ शकेल. याच बरोबर महानगर पालिकेला घनकचरा व्यवस्थापन व प्रकीयेसाठी मोठी मदत होऊ शकेल. त्यामुळे शहरातील जास्तीत नागरिकांनी किचन वेस्ट पासून कंपोस्ट खत तयार करावे असे आवाहन स्वच्छ भारत अभियानाचे प्रकल्प अधिकारी राहूल अहिरे व सौरभ जाधव यांनी केले आहे.

दिनांक १६.१२.२०२०



रेल्वे स्टेशन परिसरातील मल्हार चौक येथील अभय ललवाणी किचन वेस्ट पासून कंपोस्ट खत तयार करण्याचा उपक्रम राबवित आहेत, त्याची पाहणी करताना स्वच्छ भारत अभियानाचे प्रकल्प अधिकारी राहूल अहिरे व सौरभ जाधव आदी. (छाया – लहू दळवी)

# शहरी कचऱ्याचे विलगीकरण होणे आवश्यक

## किचन वेस्टपासून कंपोस्ट खत बनवावे : प्रकल्प अधिकारी अहिरे यांचे आवाहन

नगर– अहमदनगर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या सर्वेक्षण २०२१ व राज्य शासनाच्या माझी वसुंधरा अभियानात भाग घेतला आहे. या अभियानात यशस्वी होण्यासाठी तसेच मानांकन मिळवण्यासाठी शहरात दैनंदीन संकलित होणाऱ्या कचऱ्याचे विलगीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे, त्यामुळे कचऱ्यावर प्रक्रीया करणे सोपे होते. नागरिकांनी किचन वेस्टवर आपल्या परसबागेत प्रक्रिया केल्यास बागेतील झाडांसाठी उत्तम प्रतीचे कंपोस्ट खत तयार होऊ शकेल. याच बरोबर महानगरपालिकेला घनकचरा व्यवस्थापन व प्रकीयेसाठी मोठी मदत होऊ शकेल.

त्यामुळे शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी किचन वेस्ट पासून कंपोस्ट खत तयार करावे असे आवाहन स्वच्छ भारत अभियानाचे प्रकल्प अधिकारी राहूल अहिरे व सौरभ जाधव यांनी केले आहे.

रेल्वे स्टेशन परिसरातील मल्हार चौक येथील अभय ललवाणी हे गेल्या चार वर्षांपासून किचन वेस्ट पासून कंपोस्ट खत तयार करण्याचा उपक्रम राबवित आहेत, त्याची पाहणी श्री अहिरे यांनी केली.

यावेळी अभियानाचे शहर समन्वयक लक्ष्मण लांडगे उपस्थित होते.

नगरी

# ी चिंतेत

## ण वाढले

करी बांधवांना यापुर्वी
ने उत्पन मिळुन भरुन
काढण्याच्या वेळीच
के अक्षरश डोळ्या
आलेली पिके गेली
डाशी आलेला घास
ण्याची वेळ आली.
ना कोरोनाने कहर
वडीमोल किंमतीत
जोरदार तडाख्याने
्या पेरण्या त्यामुळे
अन पेरणी केली.
मीनीतुन कोठेतरी
पासुन सुर्यदर्शन
ले आहे. याचा
असताना पुन्हा
्यांमध्ये चिंतेचे
वातावरणामुळे
नेकजण हैराण

पुण्य नगरी

# In Short

## स्वच्छता अभियान ही चळवळ व्हावी : महापौर वाकळे



**अहमदनगर :** केंद्र शासनाच्या ₹स्वच्छ सर्वेक्षण २०२१ व महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा या अभियानात अहमदनगर महानगरपालिकेने भाग घेतला आहे. मागील वर्षी महानगरपालिकेने स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये भाग घेतला होता. लोकसहभागामुळे त्यात महानगरपालिकेने उत्कृष्ट कामगिरी केलेल्यामुळे देशात ४० वा क्रमांक मिळवला. त्यामुळे स्वच्छतेच्या बाबतीत नगर शहराचे नाव देशपातळीवर झळकले. स्वच्छतेमुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होत नाहीत. तसेच शहराच्या सौंदर्यात भर पडते. त्यामुळे या वेळी देखील नगरकरांनी स्वच्छ सर्वेक्षण २०२१ व माझी वसुंधरा या उपक्रमांसाठी साथ देऊन नगर शहर देशात टॉपटेन करावे, असे आवाहन महापौर बाबासाहेब वाकळे यांनी केले आहे.

# शेत

**अहमदनग**
गाळप हंगामातील
सहसंचालक (
कार्यालयामार्फत
साखर कारखा
संयुक्त बैठकी
आले होते. य
ऊसाच्या प्रतिटन
झाली. या वा
संघटनांच्या प्रति
८५० रुपयांची
येत्या पंधरा दि
निर्णय घ्यावा अ
जाईल,असा इ
जिल्हाधिक
भवन सभागृहा
बैठकीचे आयो
साखर नगर



स्वच्छ नगर, सुंदर नगर, हरित नगर करण्यासाठी शहरात पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत असून, या पथनाट्यात सहभागी झालेले कलाकार. (छाया – लहू दळवी)

# स्वच्छ नगर, सुंदर नगर, हरित नगर करण्यासाठी पथनाट्यातून जनजागृती

नगर – संत गाडगेबाबांनी समाजाला स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी गावोगावी जाऊन किर्तनाच्या माध्यमातून स्वच्छतेविषयी लोकप्रबोधन केले. आपला परिसर आपण स्वच्छ ठेवल्यास आरोग्य निरोगी राहते. तसेच परिसर सुंदर दिसतो. संत गाडगेबाबांनी मांडलेले स्वच्छतेविषयीचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी आहेत. याच विचारातून केंद्र शासनाने स्वच्छ सर्वेक्षण २०२१ व राज्य शासनाचे माझी वसुंधरा अभियान सुरु केले आहे.

या अभियानात महानगरपालिकेने सहभाग घेतला असून शहर स्वच्छतेच्या मोहिमेत लोकसहभाग वाढवा यासाठी शहरात पथनाटय सादरीकरणातून ओला – सुका कचरा, वेगवेगळा करा, पाणी बचतीचा संदेश, ओला कचरा परसबागेत कुजवू लोकप्रबोधन सुरु केले आहे.

या माध्यमातून नागरिकांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले जात आहे. तरी नागरिकांनी या स्वच्छता सर्वेक्षणात सहभागी होऊन महानगर पालिकेला सहकार्य करावे असे आवाहन महापौर बाबासाहेब वाकळे व आयुक्त श्रीकांत मायकलवार यांनी केले आहे.

नजीर शेख (वय २८) व आबिद नजीर शेख (वय २५) हे दोघे भाऊ गोमांसाची विक्री करत असल्याचे आढळले. पोलिसांनी दुकानाची झडती घेतली असता १५ हजार किमतीचे १०० किलो गोमांस, सत्तूर व इलेक्ट्रॉनिक काटा जप्त करण्यात आला. दोघाही आरोपींना अटक करण्यात आली. पोलिस उपनिरीक्षक सी. पी. कोसे, तसेच पोलिस नाईक के. एस. शिंदे यांनी ही कारवाई केली. या प्रकरणी पोलिस कर्मचारी यशवंत भानुदास ठोंबरे यांनी फिर्याद दिली आहे. सुपे येथे प्रथमच गोमांस विक्रीप्रकरणी कारवाई झाल्याने तो चर्चेचा विषय ठरला आहे.

प्रतिनिधी | नगर

नगर तालुक्यातील जेऊर शिवारात पोलिसांनी १७ जुगाऱ्यांना गजाआड केले. त्यांच्याकडून तब्बल १३ लाख ९१० रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला. नाशिकचे विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. प्रताप दिघावकर यांच्या पथकाने बुधवारी रात्री ही कारवाई केली. मागील काही दिवसांपासून हा जुगार अड्डा सुरू होता. या कारवाईमुळे जुगाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

जेऊर गावच्या शिवारात चाफेवाडी रस्त्याजवळ अंबादास महस्के यांच्या मालकीच्या शेतातील झाडालगत मोकळ्या जागेत बसून ५२ पत्त्यांच्या कॅटमधील अंकावर व चित्रावर पैसे लावून 'झन्ना मन्ना' नावाचा जुगार खेळत असताना पोलिसांनी हा छापा टाकला. या छाप्यात महेश भगवान साळवे (४८, विनायकनगर, नगर), प्रतीक दादासाहेब हिवाळे (२५, हरेगाव, श्रीरामपूर), शौकत शिवाजीनगर, कल्याणरोड, नगर), ... तेडमल (२५, बायजाबाई जेऊर, नगर), मधुकर नाथाजी मोहिते (४०, शिवाजीनगर, कल्याण रोड, नगर), प्रणव सुनील पंचमुख (१९, आंबेडकर कॉलनी, भिंगार), दत्तात्रय रामदास गवळी (३८, घोडेगाव, ता. नेवासे), समीर जाकीर शेख (२८, जुने मुकुंदनगर, नगर), दीपक देविदास पवार (२७, बायजाबाई चाफेवाडी, नगर), सागर आनंद दिवे (३५, सिद्धार्थनगर, नगर), मतिन खलील सय्यद (३०, जुने मुकुंदनगर, नगर) अशा १७ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. छाप्यादरम्यान २ लाख ६८ हजार ३६० रुपयांची रोख रक्कम व आठ लाख रुपये किमतीची कार, २ लाख ३० हजार रुपये किमतीच्या मोटारसायकली, २ हजार ५५० रुपये किमतीचे जुगाराचे साहित्य असा एकूण १३ लाख ९१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चढायला ... नसतानाही कंत्राटी वीज कामगाराला बळजबरीने वीज सुरू असताना खांबावर चढून दुरुस्ती करण्यास सांगितल्यामुळे शॉक बसून त्याचा मृत्यू झाला. रुपेश सुखदेव बहिरट (खडकी, ता. नगर) या कामगाराचा मृत्यू झाला.

ही घटना गुरुवारी सकाळी १० वाजता बाबुर्डी बेंद येथे घडली. रुपेश बहिरट हा खडकी, खंडाळा, बाबुर्डी बेंद येथे दोन वर्षांपासून कंत्राटी वीज कामगार म्हणून काम करत होता. कंत्राटी कामगारांना विजेच्या खांबावर चढवणे नियमात बसत नसतानादेखील तेथील वायरमन आणि वाळकी येथील वीज अभियंत्याने फोन करून रुपेशला खांबावर चढून दुरुस्तीचे काम करायला लावले. शटडाऊन घेतला असल्याचे त्याला सांगण्यात आले होते. वरिष्ठांच्या बळजबरीने रुपेश खांबावर चढला. काम करत असताना त्याला विजेचा जबरदस्त धक्का बसला. त्यामुळे त्याचा मृत्यू झाला. रुपेशच्या मृत्... कंपनीचे अधिकारी ... कंपनीने या कुटुंबा... मदत द्यावी, अशी म... नागरिकांनी ठिय्या ...

जिल्हा परि... कार्ले, बाळासाहे... समितीचे सभाप... संचालक दिलीप...

कंत्राटी कामगाराच्या मृत्यूनंतर संतप्त ग्रामस्थांनी धरणे धरले.

महि...

**विधायक** • संत गाडगेबाबांनी मांडलेले स्वच्छतेविषयीचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी : महापौर बाबासाहेब वाकळे

# 'स्वच्छ नगर, सुंदर नगर, हरित नगर'साठी पथनाट्यांतून जनजागृती

प्रतिनिधी | नगर

संत गाडगेबाबांनी समाजाला स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी गावोगावी जाऊन कीर्तनांच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन केले. आपला परिसर स्वच्छ ठेवल्यास आपले आरोग्य निरोगी राहते. परिसरही सुंदर दिसतो. संत गाडगेबाबांनी मांडलेले स्वच्छतेविषयीचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी आहेत. याच विचारातून केंद्र शासनाने स्वच्छ सर्वेक्षण २०२१ व राज्य शासनाचे माझी वसुंधरा अभियान सुरू आहे. या अभियानात महापालिकेने सहभाग घेतला असून शहर स्वच्छतेच्या मोहिमेत लोकसहभाग वाढावा, यासाठी शहरात पथनाट्य सादर करण्यात येत आहेत. ओला - सुका कचरा, वेगवेगळा करा, पाणी बचतीचा संदेश, ओला कचरा परसबागेत कुजवू असे सांगत लोकांचे प्रबोधन सुरू आहे. या माध्यमातून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले जात आहे. केडगाव उपनगरांतील स्वच्छतागृहांसमोर, तसेच शहरात अन्यत्र पथकाने पथनाट्य सादर केले. नागरिक मोठ्या कुतूहलाने ते पहात होते.

नागरिकांनी या स्वच्छता सर्वेक्षणात सहभागी होऊन महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन महापौर बाबासाहेब वाकळे व आयुक्त श्रीकांत मायकलवार यांनी निवेदनाद्वारे केले आहे.



स्वच्छतेसंदर्भात जनजागृती करण्यासाठी नगर शहराच्या विविध भागात पथनाट्ये सादर केली जात आहेत.

### रस्ता अस्वच्छ, खड्डेयुक्त

केडगाव येथील नेप्ती रस्त्यावर पथकाने स्वच्छतेचे महत्त्व सांगत पथनाट्य सादर केले. त्यासाठी स्वच्छतागृहाचा परिसर सुशोभीत करून रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. मात्र, तेथून काही अंतरावर मोठमोठे खड्डे आणि त्यात साठलेले दुर्गंधीयुक्त पाणी प्रेक्षकांना अस्वस्थ करत होते. देशातील आदर्श गाव हिवरे बाजार गावाकडे जाणारा हा रस्ता जागोजागी उखडला असून खडी वर आली आहे. तेथे टाकलेल्या मुरुमामुळे दुचाकीचालकांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत.

जमिनीचा... करण्यास... दाव्याच्या... आदेशाच... हजार रु... कर्मचार... करण्या... राजेंद्र... सोसा... या ... श्रीगं... अ... का...

नगर, ता.१७– सुनंदा सुधीर दिवाणे यांचे रविवारी (दि.१३) रोजी येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु असताना निधन झाले. त्या ५८ वर्षांच्या होत्या. नगरच्या डॉ.कळमकर हॉस्पीटलमध्ये गेल्या १५ वर्षांपासून त्या सेवेत होत्या. ज्ञानेश्वर जाधिंदे यांच्या त्या भगिनी होत.

आली आहे.

याबाबतचा प्रस्ताव रविवारी (दि.२०) हुतात्मा स्मारकात मांडण्यात येणार आहे. माजी खासदार दिलीप गांधी यांच्या हस्ते या प्रस्तावाचे पूजन करुन केंद्रीय रेल्वेमंत्री पियुष गोयल यांना सदर मागण्यांचे निवेदन पाठविण्यात येणार आहे.

पुणे–शिर्डी खाजगी लोकल रेल्वे सुरु झाल्यास भाविकांची सोय होणार आहे. विकासापासून वंचित राहिलेल्या नगर शहरालादेखील व्यापाराच्या दृष्टीकोनातून एकप्रकारे चालना मिळणार आहे. बुलेट ट्रेनपेक्षा ही रेल्वे सेवा महत्त्वाची व प्रभावशाली ठरणार असल्याचे अ‍ॅड. गवळी यांनी म्हंटले आहे.

गेल्या १५ वर्षांपासून हजारो भाविकांच्या उपस्थितीत सोहळा साजरा करुन महाभंडारा करण्यात येतो. मात्र यंदा कोरोनामुळे भाविकांच्या आरोग्यासाठी हा सोहळा रद्द करण्याचा निर्णय घेतला. यंदा श्री दत्तात्रयांना अभिषेक आणि दत्त जन्म होणार आहे. या निमित्ताने होणारा महाप्रसाद भंडारा होणार नाही. भाविक श्री दत्तात्रयांच्या दर्शनाला येऊन प्रसादाचा लाभ घेऊ शकतात, मात्र यावेळी गर्दी करु नये असे आवाहन करण्यात आले आहे.

---

## स्वच्छता अभियान नियोजन

# पंचतारांकीत मानांकनाचा संकल्प



नगर– महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या स्वच्छता व राज्य शासनाच्या वसुंधरा अभियानात गेल्या वर्षी उत्तम कामगिरी करुन थ्री स्टार मानांकन मिळवले. स्वच्छतेच्या बाबतीत देशात ४० व्या स्थानावर नगर शहर पोहोचले आहे. या वर्षी आणखी प्रयत्न करुन शहराला पंचतारांकीत मानांकन मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे, असे आवाहन मनपा आयुक्त श्रीकांत मायकलवार यांनी केले.

मनपा खातेप्रमुखांची नियोजन व आढावा बैठक नुकतीच संपन्न झाली. त्यात सर्वांना जबाबदारी देण्यात आली. स्वच्छ सर्वेक्षणचे प्रकल्प अधिकारी राहूल अहिरे व सौरभ जाधव यांनी सादरीकरण केले. मानांकनासाठी असलेले विषय सर्वांना विभागून देण्यात आले असून प्रत्येकाने जबाबदारी उत्तमपणे पार पाडावी, जनजागृती तसेच प्रत्यक्ष काम करावे, असे आवाहन मायकलवार यांनी यावेळी केले. उपायुक्त डॉ. प्रदीप पठारे, संतोष लांडगे, सहायक आयुक्त राऊत, परिमल निकम, राम चारठाणकर, प्रवीण मानकर, रोहीदास सातपूते, डॉ. अनिल बोरगे, डॉ. नरसिंह पैठणकर, अभियानाचे समन्वय लक्ष्मण लांडगे आदी यावेळी उपस्थित होते.

---

...मागणी

...५० रु. द्यावे

...शेतकरी संघटनेचे ...शेतकऱ्यांना बाहेरील वजन ...परवानगी, साखर ...साखर पोत्याची ...ऊस वाढ्याची ...रक्कम शेतकऱ्यांना ...सुधारित मॉडेल ...ऊस दराचा फायदा ...कारखान्यातील अंतराची ...निर्मिती करणाऱ्या ...शेतकऱ्यांना अतिरिक्त ...करण्यात आल्या. ...सहसंचालक ...अधिकारी ...आर. जे. ...पटारे, ...तुवर, ...भराड, ...वृद्धेश्वर, ...संचालक